# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 06.06.2012 (का.प.क्र.-2) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 06.06.2012 रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.35 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त, श्री.कुणाल कुमार,(भा.प्र.से)., प्र.नगर सचिव तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
10. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
11. स. श्री.खान अक्रम करीम खान
12. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
13. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
14. स. श्री.समिर सुभाष राजुरकर

चर्चा :

मा.सभापती :स्थायी समितीची पहिली बैठक असल्याकारणाने सर्व सदस्यांचे स्वागत करण्यात येते. एक वर्षाच्या कालावधीमध्ये सर्वांनी मिळुन शहरासाठी, महानगरपालिकेचे, स.नगरसेवकांचे हिताचे विषय, वार्डातील विकासाचे विषय प्रशासनामार्फत प्रशासनाच्या सहकार्याने पुर्ण करू या. स्थायी समितीमध्ये जे निर्णय होतील त्या निर्णयांचा पाठपुरावा झाला पाहिजे.

मा.आयुक्त :स्थायी समितीच्या सभापती निवडीनंतरची ही पहिलीच सभा असुन प्रशासनाच्या वतीने अभिनंदन करण्यात येवुन त्यांच्या कार्यकाळास सुभेच्छा देण्यात येतात.

मा.सभापती :स्थायी समितीची सभा वेळेवर सुरू होणार असुन प्रशासनाने याची दखल घ्यावी.

मा.आयुक्त :मिटींगच्या वेळेची शिस्त पाळलीतर मिटींग चांगल्याप्रकारे चालु शकते. पहिली बैठक असुन यानंतर मिटींगपुर्वी सर्व अधिकारी सभागृहात हजर राहतील.

श्री.नारायण कुचे
श्री.बाळासाहेब मुंडे :महसुल उपआयुक्त श्री.अजय चारठाणकर यांची बदली झाल्याचे वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. जकात बंद झाल्यानंतर मनपाचा सर्व गाडा हा एलबीटीवर आधारीत असुन एलबीटीद्वारे श्री.चारठाणकर यांची चांगली

वसुली केली असुन त्यांचे अभिनंदन करण्यात येते. एलबीटीच्या माध्यमातुन चांगली वसुली करुन देण्यात आलेली आहे. त्यांना एक वर्षाची मुदतवाढीसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :महाराष्ट्रात एलबीटीला सर्वात चांगला प्रतीसाद महानगरपालिकेला मिळालेला असुन शासनाने, मा.मुख्यमंत्र्यानी एलबीटीचे कौतुक केलेले आहे व प्रोत्साहनपर अनुदान मनपास देण्यात आलेले आहे. श्री.अजय चारठाणकर यांची तीन वर्षाची मुदत अद्याप पुर्ण झालेली नसुन मनपास आर्थीक कोंडीत पकडण्याचे शासनाचे धोरण तर नाही. मा.महापौरांनी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येवुन श्री.चारठाणकर यांना मुदतवाढ देण्यात यावी. अजुनही एलबीटीमध्ये सुधारणा होऊ शकते. कार्यक्षम अधिकाऱ्यांची बदली करण्यात येवु नये. अशी सभागृहातर्फे विनंती करण्यात यावी.

श्री.समिर राजुरकर :शासनाकडुन भरावयाचे पदे हे रिक्त असुन एलबीटीची आत्ता कुठे सुरूवात होत आहे व चांगल्या प्रकारे वसुली होत असुन श्री.चारठाणकर यांचेसारखे कार्यक्षम अधिकारी असणे आवश्यक आहे. मा.मुख्यमंत्री यांना प्रशासनाच्या माध्यमातुन एक वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी असे कळविण्यात यावे.

श्री.बाळासाहेब मुंडे :एलबीटीची वसुली चांगल्याप्रकारे केलेली असुन श्री.चारठाणकर गेल्यास मनपाची आर्थिक परिस्थिती बिकट होईल. शासनास फॅक्स पाठवुन एक वर्षाची मुदतवाढ घेण्यात यावी.

श्री.नारायण कुचे :मा.आयुक्तांनी श्री.चारठाणकर यांना रिलीव्ह करू नये त्यांच्या जागी शासनाने अधिकारी दिलेला नाही.

मा.सभापती :सभागृहाची स.सदस्यांची भावना लक्षात घेऊन गेल्या दोन वर्षापासून उपआयुक्त, श्री.चारठाणकर यांनी एलबीटीत पुर्णपणे योगदान देऊन संपुर्ण राज्यात एकमेव शहर असे आहे की, जकात पेक्षा जास्त उत्पन्न एलबीटीद्वारे मिळुन दिलेले आहे. याबाबत श्री.चारठाणकर यांचे व त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांचे मन:पुर्वक अभिनंदन करण्यात येते. सभागृहाची भावना लक्षात घेता प्रशासनाने शासनास कळविण्यात यावे की, एक वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी. शासनाकडील जे पदे रिक्त आहेत त्याबाबतीत प्रशासनाने / मा.आयुक्तांनी प्रयत्न केले पाहिजे. अधिकारी बदली झाल्यावर त्यांच्याजागेवर लवकर अधिकारी यांची बदलीने नेमणुक होत नाही. हा अनुभव पहाता जो ठराव घेण्यात आलेला आहे तो शहराच्या हितासाठी शासनास कळविण्यात यावे.

श्री.समिर राजुरकर :स्त्रीभ्रुण हत्यासंदर्भात वर्तमानपत्रात बातमी छापुन आलेली आहे. स्त्री भ्रुण हत्यासंदर्भात जी कार्यवाही होत आहे त्याचे मी व सभागृहाच्या वतीने समर्थन करण्यात येते. जे दवाखाने तपासणी अंती सिल करण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी कोणकोणत्या गोष्टी आक्षेपार्ह आढळल्या आहेत. त्या कारणाने दवाखाने सिल करण्यात आलेले आहे. याबाबतची माहिती सभागृहास देण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी :महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्य सचिव श्री.बांठीया तसेच जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचे सूचनेनुसार सोनोग्राफी आणि मॅटरनिटी होम यांची तपासणीची धडक मोहिम राबविण्यात येत आहे. एकुण 10 पथके तयार

केलेली असुन महसुल व पोलीस प्रशासन यांचे मार्फत ही मोहिम राबविण्यात येत आहे. शहरामध्ये एकुण 192 सोनोग्राफी सेंटर ची दहा टिमद्वारे दहा सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्यात येत आहे. दोन दिवसांपासुन 20 सोनोग्राफी सेंटरची तपासणी केली आहे. प्रसुतिपुर्व गर्भलिंग निदान प्रतिबंद कायदयानुसार एफफॉर्म् मध्ये व इतर कागदपत्र (Consultant Form) त्रुटी आढळुन आल्याने कायद्याचे उल्लंघन केल्याने 3 सोनोग्राफी सेंटर सिल केलेल्या आहेत. ज्या ठिकाणी उल्लंघन झालेले आहे त्या ठिकाणी कारणे दाखवा नोटीस देण्यात येवुन कार्यवाही केलेली आहे.

श्री.समिर राजुरकर :प्रशासन जी कार्यवाही करीत आहे त्याची माहिती पदाधिकारी तसेच सभागृहाला देणे अपेक्षित आहे.

मा.आयुक्त :बीडमधील घटनेनंतर मा.मुख्यसचिव यांनी बैठक घेऊन तपासणीचे आदेश दिलेले आहेत. त्यापुर्वी आपली मोहिम सकाळी 3 ते रात्री 12 वाजेपर्यंत चालु आहे. सदरची धडक मोहिम संपल्यानंतर सविस्तर अहवाल स्थायी समितीला आणि महासभेला सादर करण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :मा.सभापती, मा.आयुक्तांनी नालेसफाईबाबत पहाणी केलेली आहे. विष्णुनगर येथील नाल्याचे काम विनाटेंडर चालु आहे. नालेसफाईचे काम व्यवस्थितरित्या होत नाही. पुर्णपणे नाला सफाई करण्यात यावी. संपुर्ण कचरा उचलण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :नाला सफाई करतांना फक्त कचरा काढणार आहे का? की, गाळा काढणार आहे. याची माहिती घ्यावी. लिफ्टींगची प्रोव्हीजन इस्टीमेटमध्ये आहे का? असल्यास काम व्यवस्थित का होत नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता :इस्टीमेटमध्ये नाल्याची डेफ्टही एक ते दिड फुटचे नालासफाई करण्यात येते. मोठया नाल्याचे जेसीबीच्या सहाय्याने काम सुरू केलेले आहे. लहाण नाल्यांचे काम कंत्राटदारामार्फत सुरू करण्यात आलेले आहे. यामधे डिसीलिंटीगवर चार ते पाच फुट सील काढायचे असे काम तिथे केले जात नाही. फक्त नाल्याचा प्रवाह सुरळीत करण्यात येतो. एक ते दिडफुट गाळा काढण्यात येतो. असे अंदाजपत्रक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :दरवर्षी नाले साफसफाईचे टेंडर काढण्यात येते. काही ठिकाणी मनपाच्या वतीने नाल्यांची साफसफाई करण्यात येते. त्याठिकाणी काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कुठलेही नियंत्रण नाही. ठेकेदारामार्फत काम व्यवस्थित होत नाही. नाल्याच्या प्रवाहामध्ये असलेला कचरा,प्लॅस्टिक काढण्यात येते. नाल्याची डेफ्ट धेण्याचा कुठेही प्रयत्न होत नाही. शहरामध्ये 40 नाले असुन 13 नाल्यांची निवीदा काढण्यात आलेली आहे. द्वारकापुरी येथील नाल्याची साफसफाईसाठी कुणीही गेलेले नाही. छोटया नाल्यांची अवस्था ही नालीसारखी झालेली आहे. मा.सभापती आणि प्रशासनाने याची पहाणी करावी. समाधान झाल्यावर देयक अदा करण्यात यावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :पावसाळयापुर्वी नाल्यावरील अतिक्रमण काढण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या याबाबत कुठेही कार्यवाही झालेली नाही. अतिक्रमण काढण्यात यावे. तसेच ज्या ठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. त्याठिकाणी प्रशासनाने लक्ष द्यावे. दशमेशनगरच्या नाल्यावर डॉ.पानसेच्या शेजारी एक प्लॉट असुन प्लॉट मालकाचा बोर्ड लावण्यात आला असुन

नाल्याची सिमा फिक्स केलेली नसल्यामुळे माती पुढे सरकली की नाही काही कळायला मार्ग नाही. प्रशासनाने पहाणी करून प्लॉटची मार्कींग तपासून त्वरीत संरक्षित भिंत बांधण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने पहाणी करून प्लॉटची मार्कींग तपासून ताबडतोब स्थायी समितीस कळविण्यात यावे.

श्री.बाळासाहेब मुंडे :जयभवानी नगर येथील नाल्यावर अनाधिकृतरित्या बांधकाम होत आहे. प्रशासनाला याबाबत माहिती दिली असता दुर्लक्ष होत आहे.

मा.सभापती :काही अधिकारी सभागृहात सूचना देऊनही हजर नाही. हजर नसल्याकारणाने महत्वाच्या सूचना देता येत नाही.

श्री.बाळासाहेब मुंडे :नाल्यामध्ये पाणी जाण्यासाठी जागा नाही. जिवीतहानी होण्याची शक्यता आहे.

श्री.समिर राजुरकर :नालेसफाई ही वर्षानुवर्ष चालत आहे. नालेही तेच आहे. त्यावर झालेल्या अतिक्रमण प्रशासनाला माहिती पाहिजे.

मा.सभापती :नालेसफाईची पहाणी करत असतांना स.सदस्य श्री.राजु वैद्य इतर सदस्य व शहर अभियंता होते. नाल्यांची परिस्थिती अतिशय वाईट असल्याने पहाणी थांबावी लागली. मान्सुन येणार म्हणुन प्रशासनातर्फे ताबडतोब अंदाजपत्रक काढुन काम करण्यात येते. नालेसफाईचे कामाची तपासणी केल्यानंतर नालेसफाईबाबत समाधानी नाही. प्रशासनाने कुठल्याही प्रकारचे देयक अदा करण्यात येऊ नये. पुर्णपणे, बरोबर काम होत नाही. अधिकारी यांनी काम झ ाल्याचा रिपोर्ट दिल्यानंतर पुन्हा साईड व्हिजिट देण्यात येईल. तोपर्यत देयक अदा करू नये. वार्षिक नाल्याचा कॉन्ट्रॅक्ट ठरविला पाहिजे. कंत्राटदाराने वर्षभर नाल्याची देखभाल करून साफसफाई करावी. यासाठी प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी. वर्षभरासाठी निवीदा काढण्यात यावी.

श्री.सविता घडमोडे :रस्ता रूंदिकरणाबाबत प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येते. रस्त्याच्या दोन्ही साईडला ड्रेनेजचे काम चालू आहे त्यामध्ये बऱ्याच प्रमाणात गोंधळाचे काम सुरू आहे. त्यात मनपाचे लाखो रूपयांचे नुकसान होत आहे. याची चौकशी करण्यात यावी.

मा.सभापती : येणाऱ्या स्थायी समितीमध्ये याबाबत संपुर्ण माहिती देण्यात यावी.

श्री.समिर राजुरकर :हॉकर्सबाबत वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. रस्ता रूंदिकरणात व्यापाऱ्यांनी स्वत:हुन आपल्या दुकाना पाडुन रस्ते रूंदिकरणात सहकार्य केले परंतु गाडीवाल्यांनी रूंदिकरण केलेला रस्ता पुर्णपणे अतिक्रमणीत केलेला आहे.

श्री.राजु वैद्य :सदरील विभागास पुर्णवेळ अधिकारी देण्यात यावा.

मा.सभापती :अतिक्रमणाबाबत बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.समिर राजुरकर :लाड समितीच्या शिफारशीनुसार आजपर्यंत किती जणांना नियुक्त्या दिलेल्या आहेत. अशा आवश्यक परिपुर्ण कागदपत्रांच्या माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

मा.सभापती :माहिती द्यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :महानगरपालिकेने हॉकर्स झोन तयार केलेले आहेत काय? नसेल तर तयार केले पाहिजे जेणे करून सदरील नागरीकांचा कामधंदा चालला पाहिजे.

श्री.समिर राजुरकर :स्वेच्छा निधी सोडुन ए वन रेट लिस्ट चालतात या ऐवजी प्रत्येक वार्डाला प्रत्येकी 2 लाख रूपये देण्यात यावे. त्याचे टेंडर करण्यात यावे. ए वनचे

लेखा विभागात गठ्ठेच्या गठ्ठे येतात. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन स्वेच्छा निधी सोडुन फुटकळ कामासाठी (ड्रेनेज चोकअप, पाईपलाईन लिकेज अशा स्वरूपाची कामे) निश्चित अशी रक्कम वार्डाला देण्यात यावी व टेंडर काढण्यात यावे. बजेटमध्ये तशी तरतुद करण्यात यावी. सर्व काम पारदर्शी होईल.

श्री.बाळासाहेब मुंडे :कुणाच्या वार्डात किती रेटलिस्ट होत आहे याबाबतची माहिती नाही. मेंन्टनन्ससाठी वार्डाला निश्चित अशी रक्कम देण्यात यावी. जेणे करून जास्त होणारा खर्च आटोक्यात राहुन कामे मार्गी लागतील.

श्री.नारायण कुचे :ए वन रेट लिस्टच्या कामांची पहाणी केल्यास सदरील कामे जागेवर सापडणार नाहीत.

मा.आयुक्त :शहरात फुटकळ कामासाठी किंवा लिकेज वैगेरे झाल्यास तात्काळ कंत्राटदाराकडुन ते काम करून घेण्यात येते. प्रत्येक कामास दुरूस्तीस साहित्य आणि कर्मचारी सारखेच लागतात. दुरूस्तीचा वार्षिक करार केल्यास एका कंत्राटदाराला न देता चार ते पाच कंत्राटदाराला कमी दरात करारबध्द करून ठेवल्यास बजेटच्या तरतुदीप्रमाणे लगेच काम हाती घेता येईल. कंत्राटदार नियुक्ती पासुन सर्व गोष्टी कराव्या लागणार नाही. वार्षिक दर कराराचे प्रस्ताव तयार करण्याचे काम चालु आहे.

मा.सभापती :स.सदस्यांनी जो विषय मांडला आहे तो महत्वपुर्ण आहे. आज आत्तापासून रेटलिस्ट ए वन बंद करण्यात यावे. संबधीत उपअभियंता यांनी आजचा जावक क्रमांक स्थायी समितीस देण्यात यावे. लेखा विभागाने कुठलीही रेट लिस्ट ए वन घेण्यात येऊ नये. लेखा विभागाचा आजचा आवक क्रमांक स्थायी समितीस देण्यात यावे. तसेच 99 नगरसेवकांचे हेड उघडण्यात येवुन एक एक वार्डाला एक लाखाची ताबडतोब प्रोव्हिजन करण्यात यावी. मा.आयुक्तांनी सुचविल्यानुसार संबधीत अधिकारी यांनी पुर्णपणे अभ्यास करून आपले म्हणने स्थायी समितीसमोर मांडावे. निधीतले एनवन रेटलिस्ट चालू ठेवण्यात यावे. कुठलीही संचिका बिना आवक, जावक शिवाय चालवु नये.

श्री.आगा खान :एमजीएम ते मोढा नाला सर्वात जुना असुन 13 टेंडरमध्ये सदरील नाल्याचा समावेश आहे का? नसेल तर का नाही. याची डिफ्ट 13 फुट आहे. एमजीएम ते मोंढया पर्यंत जेसीबी लावुन सफाई करू शकतो. लक्ष्मणचावडी ते एमजीएम रस्ता रूंदिकरणातील अतिक्रमण काढण्यात आले आहे अजुन फायनल मार्कआऊट करण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी ड्रनेज आणि वॉटर सप्लाईचे काम करण्यात आलेले नसुन रस्त्याचे पिचींग चालु आहे. सदरील रस्त्यावर पक्के बांधकाम चालु असुन मनपाची कुठलीही परवानगी घेतलेली नाही. सदरील बांधकाम तात्काळ थांबविले पाहिजे.

मा.सभापती :प्रशासनाने तात्काळ सदरील ठिकाणी जाऊन व्हिजीट देण्यात यावी. पिचींग ताबडतोब थांबविण्यात यावे. रस्त्याचा कामाचा दर्जा चांगला झाला पाहिजे. सदरील विकास एकदाच होणार आहे. नेहमी नेहमी सदरील विकास होणार नाही. रस्ता रूंदिकरणात पुन्हा विनापरवानगी बांधकाम चालु असुन त्यावर योग्य ती कार्यवाही करून अहवाल सादर करण्यात यावा.

श्री.नारायण कुचे :रस्ता तयार करत असतांना साईड ड्रेन आणि ड्रेनेज लाईन सुरवातीला करण्यात यावी.

मा.सभापती :जुना बाजार येथील रस्त्याची पहाणी केली सदरील कामास कुठल्याही प्रकारे समाधानी नाही.नाशिक,पिंपरी चिंचवड, पुणे शहरातील रस्त्यांचा दर्जा उत्तम आहे. परंतु या शहरात रस्ता तयार करत असतांना नियम पाळले जात नाही. रस्ता तयार करण्यापुर्वी साईडड्रेन आणि ड्रेनेज लाईन हे बेसिक आहे. याबाबत सभागृहास सांगीतल्याबाबत सर्व स.सदस्यांचे अभिनंदन आणि धन्यवाद करण्यात येते.

श्री.बाळासाहेब मुंडे :प्रभाग अधिकारी प्रभागात नागरीकांना भेटण्याची निश्चित अशी वेळ देण्यात यावी. नागरीक टॅक्स भरण्यासाठी प्रभागात येतात परंतु अधिकारी प्रभागात नसतात.

मा.सभापती :3 ते 5.45 पर्यंत संबधीत सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या चेअर वर हजर राहावे. प्रशासनाने ज्या बैठका आयोजित करावयाच्या आहेत त्या सकाळच्या सत्रात आयोजित करण्यात याव्यात.

श्री.समिर राजुरकर :स.पदाधिकाऱ्यांनीही शिस्त अंमलात आणुन अधिकाऱ्यांना सायंकाळी 4 ते 6 वेळातच भेट दिली पाहिजे. तसेच स.पदाधिकाऱ्यांनी सकाळच्या दोन तासाच्या सत्रातच अधिकाऱ्यांना भेटीसाठी बोलावले पाहिजे.

मा.सभापती :स.सदस्यांची सूचना पाळण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.एम.एम.खान (उप अभि.) :एमजीएम ते जाफरगेट नाल्यातील जाफरगेटच्या मागील पोकलेन लाऊन सर्व सफाई केलेली आहे. स्मशनमारुती येथीलही सफाई करण्यात आलेली आहे. काही भागात दोन्ही बाजुंनी अतिक्रमण झालेले असल्याने मशिन जात नाही. स्मशनाभुमी ते एमजीएम पर्यंत तुरळक वस्ती असल्याने एक ते दिड फुटापर्यंत मटेरिअल काढुन घेण्यात आलेले आहे.

मा.सभापती :सदरील नाल्यावर कुठलेही काम झालेले नाही. त्या ठिकाणी सर्व मशीन जाऊ शकतात. मनपाच्या मशीन लावुन सदर नाल्याची सफाई ताबडतोब करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :बीओटी तत्वावरील कामे देण्यात आलेली होती सदरील कामे पुर्ण झालेली आहे का? सदरील काम पुर्ण करण्यासाठी किती वर्षाचा कालावधी दिला होता. त्यामधुन मनपास येणारे किती उत्पन्न अपेक्षित होते. कालवधीत काम न होता जर मुदतवाढ दिली असेल तर ती कोणाच्या परवानगीने मुदतवाढ देण्यात आली आहे. खुलासा देण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासनाने माहिती देण्यात यावी.

श्री.समिर राजुरकर :पारदर्शी माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता :बीओटीवर चार प्रोजेक्ट घेण्यात आलेले आहे. 1. ज्योती नगर स्विमींग पुल. 2. शहानुरवाडी येथील भाजी मार्केट 3. रेल्वेस्टेशन येथील शॉपिंग कॉम्पलेक्स 4. सिध्दार्थ गार्डन येथील पार्कींग आणि शॉपिंग कॉम्पलेक्स

श्री.रेणुकादास वैद्य :वर्क ऑर्डर डेट आणि टाईमपिरेड सांगण्यात यावे.

श्री.समिर राजुरकर :याबाबतची सर्व लेखी माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता :याबाबतची संपुर्ण माहिती पुढील स्थायी समिती बैठकीत देण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :गेल्या पाच वर्षापासुन श्री.सिकंदर अली या कामाची देखरेख करीत आहे. याबाबतची संपुर्ण माहिती त्यांना आहे. सदरील प्रोजेक्टला वर्क ऑर्डर कधी दिली आणि कालावधी किती होता. याबाबतची माहिती देण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता** : **शहानुरवाडी येथील भाजी मार्केट, रेल्वेस्टेशन येथील शॉपिंग कॉम्पलेक्स, सिध्दार्थ गार्डन येथील पार्कींग आणि शॉपिंग कॉम्पलेक्सचे प्रोजेक्टचे टाईम लिमीट संपलेले आहे.**

**श्री.रेणुकादास वैद्य** :**कालावधी संपल्यावरही कामे कशी सुरू आहे.**

**कार्यकारी अभियंता** :**त्यांचे एएमसी कंम्पोनंन्टस् आहे.**

**मा.सभापती** :**वर्क ऑर्डर केव्हा दिली.**

**कार्यकारी अभियंता** :**सर्व संचिका पाहुन सविस्तर टिपणी देण्यात येईल.**

**मा.सभापती** :**10 मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात येत आहे.**
**(तहकूब सभा वेळ दूपारी 12.25 मि.)**
**(तहकूब सभा सुरू वेळ दूपारी 12.50 मि.)**

**कार्यकारी अभियंता** :**सिध्दार्थ गार्डन येथील पार्कींग आणि शॉपिंग कॉम्पलेक्सचे प्रोजेक्टचे टाईम लिमीट 31 मार्च 2010 रोजी संपलेली आहे. प्रती दिन 1500 रूपये दंड आकारण्यात आलेला आहे. संबधीत कंत्राटदाराकडुन आजपर्यंत 8 लाख 86 हजार रूपये दंड वसुल करण्यात आलेले आहे. 5708 स्के.मि. आपल्या भागात दोन मजली पार्किंग पुर्ण केलेली आहे. शहानुरवाडी येथील भाजी मार्केट चे टाईम लिमीट 17 ऑक्टोबर 2010 रोजी संपलेली आहे. त्याच्यामध्ये एएमसी कंम्पोनंन्ट आहे. 1000 स्के.फुट व्हिजिटेबल मार्केट पुर्ण करून हस्तांतरीत करून दिलेले आहे. युरोपियन मार्केटचे टेंडर कॉल करण्यात आलेले असुन सर्वसाधारण सभेने त्यास मान्यता दिलेली आहे. सेकंड फ्लोअरच काम चालु आहे. रेल्वेस्टेशन येथील 540 स्के.मि. बिल्डींग तयार करून हस्तांतरीत करावयाची होती. 540 स्के.मि. हे महानगरपालिकेचे कंम्पोनंन्ट आहे. बिल्डींग तयार करून हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. तसेच टेंडर कॉल करून फायनल करण्यात आलेले आहे. सर्वसाधारण सभेने यास मान्यता दिलेली आहे.**

**श्री.समिर राजुरकर** : **What is mean by AMC componants**

**कार्याकारी अभियंता** :**बीओटीमध्ये कोणताही एक भाग बिल्डरकडुन Free of cost विकसीत करून घेणे.**

**श्री.रेणुकादास वैद्य** :**31 मार्च 2010 रोजी मुदत संपलेली असुन आज रोजी पर्यंत काम चालु आहे. महानगरपालिकेचे कंम्पोनंन्ट आहे तो भाग हस्तांतरित केलेला आहे.**

**कार्यकारी अभियंता** :**पार्कींगचे काम पुर्ण झालेले आहे. कंम्पलिशन घेऊन हॅन्डओव्हर करण्यात येणार आहे.**

**श्री.रेणुकादास वैद्य** :**पार्कींगचे दोन मजले हॅन्ड ओव्हर करायला हवे होते. ते अद्याप पर्यंत करण्यात आलेले नाही. यातुन किती उत्पन्न अपेक्षित आहे.**

**कार्यकारी अभियंता** :**अगोदरच्या पर्कींगमधुन 1200 ते 1500 रूपये प्रती दिवस उत्पन्न प्राप्त होत होते. सन 2010 पासुन उत्पन्न येत नाही. तेव्हापासुन दंड आकारण्यात येत आहे.**

**श्री.रेणुकादास वैद्य** :**1200 रूपये प्रतीदिवस नुकसान झालेले आहे. अद्यापपर्यंत हॅन्डओव्हर करण्यात आलेले नाही. सन 2010 मध्ये मुदत संपलेली असतांना कुणाच्या परवानगीने मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आर्थीक संबधीत विषय आहे. प्रशासनाने कुठलेही नियोजन केलेले नाही. लाखो रूपयांचे नुकसान झालेले आहे. कशाच्या आधारे दंड आकारण्यात आलेला आहे. जे नुकसान झालेले आहे त्याची जबाबदारी कुणाची आहे.**

मा.सभापती :1500 रूपये दंड आकरणीबाबत टेंडरमध्ये समावेश करण्यात आला होता का याबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :यामधुन किती उत्पन्न प्राप्त होईल याबाबत मालमत्ता विभागातुन माहिती घेतली होती. त्याप्रमाणे रूपये 1200 प्र.दिन आकारण्यात आले.

मा.सभापती :मालमत्ता विभागामार्फत पेनल्टी आकारण्यात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता :या जागेचे उत्पन्न किती येत होते. त्याच्या आधारे करण्यात आलेले आहे.

मा.सभापती :मालमत्ता विभागाने जे सांगीतले त्याबाबत कुठली परवानगी घेतली आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :सन 2010 चे उत्पन्न 1500 रूपये मालमत्ता विभागाने धरण्यात आलेले आहे. आता सन 2012 चालु आहे.

मा.सभापती :आर्थीक बाबींसंदर्भात निर्णय घेण्यासंदर्भात मनपामध्ये दोन सक्षम बॉडी अस्तित्वात आहे. मालमत्ताने सांगीतल्या प्रमाणे संचिका पुटअप करण्यात आलेली आहे. याबाबत कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. सन 2010 पर्यत 1500 रूपये दंड आकारायला हवा होता व त्यानंतरचा निर्णय स्थायी समितीने घ्यायला हवा होता. प्रोजेक्टची मुदत संपल्यानंतर पुढील निर्णयासाठी स्थायी समितीपुढे प्रकरण यायला हवे होते.

श्री.समिर राजुरकर :मनपाचे दुकानांचे ऑक्शन करतांना रेडी रेकनर लावला जातो. तसेच ॲक्टमधील तरतुदीनुसार दंड आकारण्याबाबत मंजूरी घेतलेली आहे का.

कार्यकारी अभियंता :पुर्वी सिध्दार्थ गार्डन मधील पार्कीगमधुन किती उत्पन्न येत होते त्याच्या आधारे दंड लावण्यात आलेला आहे.

मा.सभापती :कुठलेही टेंडर एक किंवा दोन वर्षाचे असतात. बीओटीच्या कामास टाईम पिरेड किती होता.

कार्यकारी अभियंता :दोन वर्षाचा.

मा.सभापती :सन 2010 च्या नंतरचे फाईन बाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.नारायण कुचे :सन 2010 पासुन आजपर्यंत एकुण 27 महिणे झालेले आहे. आजपर्यंत किती फाईन लावयला पाहिजे होते याबाबत मंजूरी घेण्यात आलेली आहे का?

मा.सभापती :प्रोजेक्ट महानगरपालिकेसाठी महत्वाचा आहे. हायलाईट होते की महानगरपालिकेने हा प्रोजेक्ट शहरात उभा केलेला आहे. त्या ठिकाणी फक्त बांधकाम साहित्य पहाण्यास मिळत आहे. मुदतवाढ न देता सदरील कामातुन त्यांना बाहेर काढले पाहिजे होते.

श्री.समिर राजुरकर :शहानुरवाडी येथील युरोपियन मार्केट येथील टेंडर कॉल केलेले आहे. ॲग्रीमेंटमध्ये केलेल्या नॉर्मस् प्रमाणे आहे का?

कार्यकारी अभियंता :नॉर्मस् प्रमाणे बरोबर आहे.

श्री.समिर राजुरकर :सदरील जागेवरील नाल्याची साईज युरोपियन मार्केट होण्यापुर्वी व मार्केट तयार झाल्यानंतर घेण्यात आली होती का? यामध्ये किती अंतर आहे.

कार्यकारी अभियंता :नाल्याचा प्रवाह मेंन्टेन करण्यात आलेला आहे.

श्री.समिर राजुरकर :प्रवाह बाबत माहिती न देता नाल्याची साईज पुर्वी प्रमाणे आज साईज आहे का?

कार्यकारी अभियंता :एक्झसींटिंग नाला मेंन्टेन करण्यात आलेला आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :काम सुरू होण्यापुर्वी नाल्याची रूंदि आज रोजी कायम आहे का?

कार्यकारी अभियंता : नाल्याची रूंदि मेंन्टेन करण्यात आलेली आहे.

**श्री.समिर राजुरकर** :सर्व विषयावर प्रशासन गंभिर आहे का? मॅपवर जर नाल्याची साईज 24 फुट असेल तर तो नाला 24 फुट मेन्टेंन ठेवला पाहिजे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :प्रवाह मेंन्टेन ठेवण्यासाठी फुटाची साईज इंचामध्ये आल्यास तो भाग वेगळा आहे. सदरील विषय गंभिर आहे. कुणाचीही परवानगी न देता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील प्रोजेक्ट आहे त्या स्वरूपात महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे व मनपाच्या खर्चाने प्रोजेक्ट पुर्ण करण्यात यावा. जेणे करून जनतेला दिलेले आश्वासन पुर्ण करता येईल. असा निर्णय सदरील प्रकरणात घेण्यात यावा.

**श्री.खान अक्रम** :स्थायी समितीच्या सभागृहात वातानुकूलित सिस्टीम बसविण्यात यावी.

**मा.सभापती** :महानगरपालिकेमध्ये सर्वच कॅबिनमध्ये एसी लावण्यात आलेल्या आहे. आर्थिक बाबींचा निर्णय ज्या समितीमध्ये घेतला जातो ती नॉन एसी मध्ये बसलेली आहे.

सदरील प्रोजेक्ट आर्थिक बाबींशी निगडीत असुन सन 2010 नंतर कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. 31.03.2010 पर्यंत सिध्दार्थ गार्डन येथील पार्कींग, 17.10.2010 शहानुरवाडी, रेल्वेस्टेशन सप्टेंबर 2009 एवढयापर्यंत आपण बांधील होतो. यानंतर मालमत्ता विभागाने सांगीतल्यानंतर जी पेनल्टी लावण्यात आलेली आहे. सन 2010 नंतर जी पेनल्टी पुटअप करण्यात आली. 1500 रूपये जी पेनल्टी लावण्यात आलेली आहे. त्यामध्ये संबधीतांचे नुकसान होत नाही. महानगरपालिकेची प्रतिमा खराब होत आहे. स.सदस्यांनी सूचविल्यानुसार आज ज्या परिस्थित आहे त्या परिस्थितीत विषय थांबविण्यात यावा. पुढच्या निर्णयापर्यंत तिथेच थांबविण्यात यावे.

**श्री.मोहन मेघावाले** :सलिम अली सरोवरमध्ये एचटीपी आणि सौंदर्यीकरणाचे प्रोजेक्ट सुरू आहे. वर्क ऑर्डर केव्हा देण्यात आलेली आहे. ॲग्रीमेंटबाबत माहिती देण्यात यावी. रक्कम कशा पध्दतीने द्यावयाचे ठरलेले आहे. तसेच आज रोजी काम सुरू आहे की, नाही.

**मा.सभापती** :त्या ठिकाणी जाऊन साईड व्हिजिट देण्यात येईल. वैयक्तिकरित्या संपुर्ण कामाची माहिती घेण्यात येईल. त्यानंतर अधिकारांचे म्हणने ऐकुन घेऊ. ज्या सूचना सभागृहाने दिलेल्या आहेत त्याचे पालन झाले पाहिजे. स.सदस्यांनी विचारलेले प्रश्न, माहिती पुढील सभेत आली पाहिजे.

**<u>विषय क्र. 02 :</u>**

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**मा.सभापती** :विषय क्रमांक 2

**श्री.गिरजाराम हाळनोर** :इतिवृत्त कायम करण्याचा विषय आहे. 6 ते 7 बैठकांचे इतिवृत्त कायम करण्यासाठी आलेले आहेत. सदरील इतिवृत्तांचा अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात यावा.

**मा.सभापती** :विषय क्रमांक 2 इतिवृत्तांचा अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात येतो. पुढील बैठकीत सदरील विषय घेण्यात येईल.

**<u>ठराव :</u>**

**सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील विषय पुढील सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.**

**याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**